# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

## परिपत्रक

मा. राज्यपाल महोदयांच्या निर्देशानुसार, कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या दिनांक २० जुलै, २०२२ रोजीच्या पत्रानुसार महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम, २०१६ मधील आर्थिक बाबींशी निगडीत तरतुदींची अमलबजावणी विद्यापीठामार्फत योग्य रित्या होण्याकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

उपरोक्त पत्रातील सूचनेनुसार व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १८-६ (ड) नुसार विद्यापीठाचे लेखे Accrual Accounting System नुसार ठेवणे आवश्यक आहे.

उपरोक्त पत्रातील मार्गदर्शक सूचना व विद्यापीठातील सद्यस्थिती याचा विचार करता Accrual Accounting System पध्दतीवर आधारीत लेखे तयार करण्यासाठी तांतडीने कार्यवाही करण्यासाठी विद्यापीठाने मे. व्ही. एन. व्ही. ॲण्ड कं., यांची वित्तीय सल्लागार म्हणून नेमणूक केली आहे.

सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुखांना मा. कुलगुरुंनी मान्य केलेल्या टिपणीतील निर्देशानुसार या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठाचे सन २०२३-२४ चे वार्षिक लेखे Accrual Accounting Accounting पध्दतीने तयार करण्यासाठी आपल्या विभागाअंतर्गत होणाऱ्या आर्थिक बाबींपैकी प्रलंबीत येणे बाकी व देणे बाकी रक्कमेच्या सर्व नोंदी व संपत्तीचा तपशिल विभागातील अभिलेख्यावरुन तांतडीने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जेणेकरुन विद्यापीठाचे Accrual Accounting System पध्दतीवर आधारीत २०२३-२४ साठीचे वार्षिक लेखे तयार करुन विधान मंडळास सादर करणे शक्य होईल.

१) सोबत जोडलेल्या प्रपत्र 'अ' नुसार तसेच विभागाअंतर्गत येणाऱ्या कामकाजाच्या स्वरुपानुसार सर्व विभागानी वेळेत संपत्तीचा तपशील वार्षिक लेख्यामध्ये नमुद करण्यासाठी आपल्या विभागातील डेड स्टॉक रजिस्टर अद्ययावत करुन आपल्या विभागातील ३१ मार्च २०२४ अखेरील प्रलंबीत येणे बाकी व देणे बाकी रक्कमेचा सर्व तपशील व उपलब्ध केमीकल /कंझ्युमेबल /स्टेशनरीचा साठा यांचा तपशील वित्त व लेखा विभागास दिनांक १५ एप्रिल, २०२४ पर्यंत सादर करावी.

२) उपरोक्त कामासाठी आवश्यकता असल्यास आपल्या विभागाअंतर्गत असलेल्या अभिलेखे पडताळणीसाठी वित्त व लेखा विभागातील कर्मचारी अथवा वित्तीय सल्लागार मे. व्ही. एन. व्ही. ॲण्ड कंपनी यांचे प्रतिनिधी (सनदी लेखापाल) यांना वेळोवेळी पडताळणीसाठी तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधीतांना आपल्या स्तरावर सूचीत करावे. तसेच उपरोक्त कामकाजा दरम्यान वेळोवेळी आवश्यक असलेली माहिती शैक्षणिक व प्रशासकीय विभागाकडून मागवण्यात येईल.

विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर. ][
संदर्भ क्रमांक वित्त व लेखा /२०२३-२४/111-220 ][
दिनांक :- २८.०३.२०२४ ][
1-4-2024
*****

(signature)
**वित्त व लेखाधिकारी**

**प्रत:-**

१) मा. कुलगुरु यांच्या स्वियसहाय्यक डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर. यांना मा. कुलगुरुंच्या आवलोकनार्थ सादर करण्यास्तव.

**प्रत कार्यवाहीस्तव:-**

१) मा. प्रकुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
२) मा. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
३) मा. संचालक, उपपरिसर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, धाराशिव.
४) सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
५) अंतर्गत लेखा परीक्षक, वित्त व लेखा विभाग योग्य त्या कार्यवाहीस्तव.

## प्रपत्र 'अ'

## विभागाअंतर्गत येणाऱ्या कामकाजाच्या स्वरुपानुसार सर्व विभागांनी खालील विषयाप्रमाणे प्रलंबीत येणे बाकी व देणे बाकी रक्कमेचा तपशील

| **शैक्षणिक विभाग / संशोधन केंद्र** | **स्थावर** | **परिक्षा** |
|---|---|---|
| परिक्षा शुल्क | ॲसेट | महाविद्यालय परिक्षा शुल्क/शाखा शुल्क |
| शिक्षण शुल्क | अनामत | विलंब शुल्क |
| प्रयोगशाळा शुल्क | विद्युत देयके देणे | निकालपत्रिका महाविद्यालय |
| दंड रक्कम | पाणी पुरवठा शुल्क | रद्दी |
| डिपॉजीट/इ.एम.डी | कर शुल्क | इतर शुल्क |
| कन्सलटन्सी शुल्क | राखीव देयके | |
| माहितीचा अधिकार शुल्क | अग्रीम पी.डब्ल्यु.डी | |
| इतर शुल्क/देय/येणे | विद्यापीठ निवासस्थानाचे भाडे/ईमारत/पाणी व वीज आकारणी/डिपॉजीट | |
| | लिज भाडे/नाट्यगृह भाडे | |
| | इतर संपत्ती विवरण | |
| **विद्यार्थी विकास** | **राष्ट्रीय सेवा योजना** | **क्रिडा विभाग** |
| इंद्रधनुष्य शुल्क | आव्हान | अश्वमेध शुल्क |
| अविष्कार शुल्क | राष्ट्रीय सेवा योजना शुल्क | क्रिडा शुल्क |
| युवक शुल्क | इतर शुल्क | जिमखाना |
| अभियान | अग्रीम | बॅटमिंटन शुल्क |
| विद्यापीठ शुल्क | **ग्रंथालय** | जलतरण शुल्क |
| विद्यार्थी कल्याण शुल्क | दंड येणे बाकी | इतर शुल्क |
| कुलगुरु कार्यालय शुल्क | डिपॉजीट /इ.एम.डी | **सामान्य प्रशासन** |
| वसतीगृह शुल्क | इतर शुल्क | वाहन कर/डिपॉजीट/भाडे |
| वसतीगृह दंड शुल्क | इंटरनेट लॅब शुल्क | पुरवठादार डिपॉजीट/इ.एम.डी/दंड इ. |
| उपहारगृह/मेस/शॉप | गहाळ पुस्तके शुल्क येणे | |
| कमवा व शिका शुल्क | | |
| अग्रीम | | **सीफार्ट** |
| **अतिथीगृह** | **इतिहास** | कन्सलटन्सी शुल्क येणे बाकी |
| अतिथीगृह शुल्क | म्युझियम शुल्क/इतर | दंड शुल्क येणे बाकी |
| मेस शुल्क | | |